**खान्देशातील साहित्यिकांना प्रोत्साहन, व्यासपीठ आवश्यक- एकनाथराव खडसेरविवार, १४ फेब्रुवारी, २०१६**

उत्तर महाराष्ट्र साहित्य सभेचे तिसरे साहित्य संमेलन

जळगाव : खान्देशच्या या सुपीक मातीत अनेक साहित्यिक निर्माण झाले. आजही येथे लिहिणारे खूप आहेत, परंतू ते सूप्त आहेत. त्यांच्या सामर्थ्यशाली लेखणीला व्यासपीठ नाही. त्यांना हक्काचं व्यासपीठ मिळावे आणि नव साहित्यिकांना प्रोत्साहन मिळावे यासाठीच उत्तर महाराष्ट्र साहित्यसभेने हे साहित्यसंमेलन आयोजित केले आहे. अशा साहित्य संमेलनांमधून साहित्य निर्मितीला चालना मिळावी म्हणून 5 लाख रुपयांचे अनुदान देण्यास मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली असल्याची घोषणा पालकमंत्री एकनाथराव खडसे यांनी केली.

त्यांनी चांगल्या साहित्यिकांना प्रोत्साहन देण्यासाठी काही पुरस्कारांची घोषणाही यावेळी केली. उत्तर महाराष्ट्र साहित्य सभा नाशिक यांच्या वतीने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात तिसऱ्या साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या एक दिवसीय संमेलनाचे उद्‌घाटन ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते करण्यात आले. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी लेखक भारत सासणे हे होते. साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून श्री. खडसे बोलत होते.

यावेळी आमदार स्मितातार्इ वाघ, माजी मंत्री व उत्तर महाराष्ट्र साहित्य सभेचे विश्वस्त डॉ. हेमंत देशमुख, जिल्हाधिकारी रुबल अग्रवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी आस्तिककुमार पाण्डेय, अध्यक्ष डॉ. रवींद्र देशमुख, कार्याध्यक्ष अमोल नाले, मुरलीधर नाले आदी उपस्थित होते.

श्री.खडसे म्हणाले, समाजमनाला संस्कारित करण्यासाठी साहित्य निर्मिती आवश्यक आहे. नवं नवं साहित्य हे निर्माण झालं पाहिजे. अशा प्रकारे साहित्य निर्मितीसाठी, ते वृद्धिंगत करण्यासाठी साहित्य अभिरुची निर्माण व्हावी, नव्या आणि जुन्या साहित्यिकांमध्ये विचारांची देवाण-घेवाण होण्यासाठी अशा विभागीय साहित्य संमेलनांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

साहित्यिकांना दाद आणि प्रोत्साहन देण्यासाठी विविध पुरस्कार दिले पाहिजेत, असे सांगून त्यांनी स्वतःच्या ट्रस्टच्या माध्यमातून पुरस्कारांची घोषणा केली व हे पुरस्कारही याच समारंभात देण्यात आले